ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X Issue - II April - June - 2021

MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.), M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# EDITORIAL BOARD


| | |
|---|---|
| **Professor Kaiser Haq**<br>Dept. of English, University of Dhaka,<br>Dhaka 1000, Bangladesh. | **Roderick McCulloch**<br>University of the Sunshine Coast,<br>Locked Bag 4, Maroochydore DC,<br>Queensland, 4558 Australia. |
| **Dr. Ashaf Fetoh Eata**<br>College of Art's and Science<br>Salmau Bin Adbul Aziz University. KAS | **Dr. Nicholas Loannides**<br>Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,<br>Faculty of Computing, North Campus,<br>London Metropolitan University, 166-220 Holloway Road,<br>London, N7 8DB, UK. |
| **Muhammad Mezbah-ul-Islam**<br>Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of<br>Information Science and Library Management<br>University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh. | **Dr. Meenu Maheshwari**<br>Assit. Prof. & Former Head Dept.<br>of Commerce & Management<br>University of Kota, Kota. |
| **Dr. S. Sampath**<br>Prof. of Statistics University of Madras<br>Chennari 600005. | **Dr. D. H. Malini Srinivasa Rao**<br>M.B.A., Ph.D., FDP (IIMA)<br>Assit. Prof. Dept. of Management<br>Pondicherry University<br>Karaikal - 609605. |
| **Dr. S. K. Omanwar**<br>Professor and Head, Physics,<br>Sat Gadge Baba Amravati<br>University, Amravati. | **Dr. Rana Pratap Singh**<br>Professor & Dean, School for Environmental<br>Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar<br>University Raebareily Road, Lucknow. |
| **Dr. Shekhar Gungurwar**<br>Hindi Dept. Vasantrao Naik<br>Mahavidyalaya Vasarni, Nanded. | **Memon Sohel Md Yusuf**<br>Dept. of Commerece, Nirzwa College<br>of Technology, Nizwa Oman. |
| **Dr. S. Karunanidhi**<br>Professor & Head,<br>Dept. of Psychology,<br>University of Madras. | **Prof. Joyanta Borbora**<br>Head Dept. of Sociology,<br>University, Dibrugarh. |
| **Dr. Walmik Sarwade**<br>HOD Dept. of Commerce<br>Dr. Babasaheb Ambedkar Marathwada<br>University, Aurangabad. | **Dr. Manoj Dixit**<br>Professor and Head,<br>Department of Public Administration Director,<br>Institute of Tourism Studies,<br>Lucknow University, Lucknow. |
| **Prof. P. T. Srinivasan**<br>Professor and Head,<br>Dept. of Management Studies,<br>University of Madras, Chennai. | **Dr. P. Vitthal**<br>School of Language and Literature<br>Marathi Dept. Swami Ramanand<br>Teerth Marathwada University, Nanded. |



Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# EDITORIAL BOARD


**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. Safiqur Rahman**
Assistant Professor, Dept. of Geography,
Guwahati College Bamunimaidam, Guwahati,
Assam.

**Dr. Raju Munghate**
Principal,
Shri. Govindrao Munghate Arts and Science College,
Kurkheda, Dist. Gadchiroli.

**Dr. Ravindra Vithoba Vikhar**
Head Department of Sociology,
Shri. Govindrao Munghate Arts and Science College,
Kurkheda, Dist. Gadchiroli.

**Dr. B. M. Karade**
President,
Vidharbha Marathi Samajshastra Parishad.

**Dr. Gopi Nimbarte**
Dean, VNIT College, Nagpur.

**Prof. Dr. Narendra Arekar**
Head of the Department of Marathi,
Shri. Govindrao Munghate Arts and Science College,
Kurkheda, Dist. Gadchiroli.

**Dr. Dasharath D. Ade**
Head of the Department of History,
Shri. Govindrao Munghate Arts and Science College,
Kurkheda, Dist. Gadchiroli.



PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)



Adarsh Arts & Commerce College, Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# CONTENTS OF MARATHI - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | कोव्हिड-१९ महामारीचा जागतिक पातळीवर झालेला शैक्षणिक परिणाम<br>**Assistant Prof. M. B. Rewatkar** | १-६ |
| २ | राजकीय गुन्हेगारी, राजकीय संस्कृती आणि राजकीय सामाजीकरण<br>**प्रा. निखिल गणेश जगताप** | ७-१३ |
| ३ | ग्रामीण विकास आणि सामाजिक परिवर्तन<br>**डॉ. नलिनी ईश्वरदास बोरकर** | १४-२३ |
| ४ | स्त्रियांच्या कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ व उपाययोजना<br>**प्रा. पितांबर विठोबाजी पिसे** | २४-२७ |
| ५ | कोरोनाचा असंघटित कामगार (मजुर) यांवर झालेल्या परिणामांचा समाजशास्त्रीय अध्ययन<br>**प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार** | २८-३२ |
| ६ | महानुभावियांची गद्यपरंपरा : एक अभ्यास<br>**डॉ. संजय रा. पाखमोडे** | ३३-३९ |
| ७ | ग्रामीण विकासासाठी शासन आणि प्रशासनाची कार्यपद्धती<br>**प्रा. डॉ. संकेत सुरेश काळे** | ४०-४६ |
| ८ | कोविड-१९ लॉकडाऊन आणि महिला अत्याचार<br>**प्रा. विणा एस. काकडे** | ४७-५० |
| ९ | कोविड-१९ ही जागतिक समस्या<br>**प्रा. डॉ. विट्ठल गोपा चव्हाण** | ५१-५६ |
| १० | कोविड-१९ चे शिक्षण क्षेत्रावरील परिणाम<br>**डॉ. आस्तीक मुंगमोडे** | ५७-६० |
| ११ | तृतीय पंथीयांचे समायोजन आणि पुनर्वसन एक सामाजिक समस्या<br>**प्रा. कविता वामनराव उईके** | ६१-६५ |
| १२ | आदिवासी समाजावर कोरोनाचा (कोव्हीड-१९) पडलेला अभाव<br>**श्री. खुशाल जीवन सातपुते**<br>**प्रा. डॉ. रविंद्र वि. विखार** | ६६-७० |




Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

VOLUME - X, ISSUE - II - APRIL - JUNE - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com) AP-9

# ९. कोविड-१९ ही जागतिक समस्या

प्रा. डॉ. विट्ठल गोपा चव्हाण
समाजशास्त्र विभाग प्रमूख, आदर्श कला वाणिज्य महाविद्यालय, देसाईगंज, जि. गडचिरोली.

प्रस्तावना

आज कोरोना या आजारामुळे जगभरातील करोडो लोकांना याची लागन झाल्याचे दिसून येते. यासाठी प्रत्येक राष्ट्र आपअपल्या पध्दतीने कोरोना व्हायरसला आपल्या देशातून हाकलून लावण्याचा किंवा कोरोनाचा नायनाट करण्याचा कसोटीने प्रयत्न करीत आहे. कोविड-19 या जीव घेण्या आजाराची उत्पती डिसेंबर 19 मध्ये चीनमधील वुहान शहरातून झाल्याचे दिसून येते. डिसेंबर 2019 मध्ये चीनमधील वुहान शहरात हा रोग उदयास येवून ब-याच लोकांना या विषाणूचे लागन झाल्याचे दिसून आले. हा आजार निमोनियाचाच एक प्रकार असल्याचे निष्पन्न झालेला आहे. वुहान शहरातील काही लोक सजीव प्राण्यांचे व्यापार करतात. या जनावरामधून कोरोना व्हायरस एक नविन विषाणू जन्माला येवून केवळ चिनमध्येच नाही, तर संपूर्ण जगातील मानव जातीला या जीव घेण्याÚया रोगाने त्रस्त करून सोडले. संपूर्ण जगात या विषाणूने हाहांकार माजविलेला आज दिसतोय.

जानेवारी 2020 मध्ये चिनी प्रधानमंत्र्यांनी त्याला कोविड या रोगाचा प्रतिबंध करण्यासाठी व त्यावर नियंत्रण आणण्यासाठी प्रभावी प्रयत्न करण्याचे आव्हान केले. एप्रील 2021 पर्यंत जवळपास 180 देशांमध्ये उदा. भारत, पाकिस्तान, जमर्नी, इटली, जपान, अमेरिका,दक्षिण कोरीया,चीन, इराण अशा वेगवेगळया देशात या रोगाने धुमाकुळ घातलेला आहे. भारतातील वेगवेगळया राज्यात उदा. दिल्ली, उतरप्रदेश, बिहार, बंगाल,राजस्थान,गुजरात अशा सर्व राज्यातील ग्रामीण भागात या रोगाने थैमान माजविलेला आहे. आज पर्यंत लाखो लोकांचे प्राण या कोरोना विषाणू किंवा व्हायरसनी घेतल्याचे आढळून येते. त्यामुळे यारोगाची धास्ती प्रत्येक व्यक्तीच्या मनामध्ये एंक प्रकारची घर करून बसलेली आहे. कोविड -19 चा दुरगामी परिणाम संपूर्ण मानव जातीवर पडलेला आहे. जानेवारी 2020 मध्ये कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेनी आंतरराष्ट्रीय चिंतेनी सार्वजनिक आरोग्य आणीबानी घोषीत केली होती.

'सामाजिक समस्या म्हणजे एखादया समाजातीन लखणीय संख्येच्या व्यक्तीच्या सामाजिक वर्तनातील बिघाड त्या समाजातील इतर लोकांना गंभिर परिणाम भोगावयाच लावते म्हणजे सामाजिक समस्या होय' अशी व्याख्या मर्टन आणि निस्बेट केलेली आहे. यावरून असे लक्षात येते की, कोविड-19 सुध्दा जागतिक समस्याचा एक भाग आहे. कारण या संसर्गजन्य रोगाचा प्रसार फार झपाटयाने वाढत असून लोकांच्या मनात भय भिती निर्माण करणारा आहे.



PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

कोरोना विषाणूचे नाव-लॅटिन भाषेत कोरोनाचा अर्थ 'मुकूट' असा होते. कोरोना विषाणूच्या कणातून जे गर्द व इर्द काटे निघतात ते इलेक्ट्रान सुक्ष्मदर्शीमध्ये बधीतले असता मुकूटासारखा आकार असल्याचे दिसून येते. यावरून याला कोरोनां व्हायरस असे म्हटले जाते. जागतिक आरोग्य संघटनेनी कोरोना या विषाणूच्या साथीच्या रोगाचे नामकरण 'कोविड 19' असा केलेला आहे.

कोरोना हा आजार प्राण्यांप्रमाणेच माणसांमध्ये सुध्दा मोठया प्रमाणात प्रसार होत आहे. माणसांमध्ये या रोगाचा प्रसार श्वसन संसर्गाद्वारे होत असते. या विषाणूमुळे सामान्य सर्दी -खोकल्यापासून ते गंभीर स्वरूपातील श्वसनाचा आजार होवू शकतो. त्यामुळे भारतासह अनेक राष्ट्रात कोविड-19 च्या प्रादुर्भावामुळे मृत्यूदरात मोठया संख्येत वाढ झालेली दिसत आहे. या जीव घेण्या आजाराविषयी अनेक लोकांच्या मनात भयाची भावना निर्माण होवून नकारात्मक विचार सरणीमुळे मृत्यूला कारणीभूत ठरत आहे. कित्येक लोकांच्या मनात शंका, भिती, व चिंताजनक वातावरण व चिंतेची बाब यामूळे ह्रदय विकारासारख्या आजाराला कारणीभूत ठरत असावे.

तज्ञांच्या मते, एखादया व्यक्तीची रोग प्रतिकार शक्ती मजबूत असेल तर कोणताच प्रश्न निर्माण होत नाही. परंतू जर रोग प्रतीकार शक्ती कमजोर किंवा कमकुवत असेल तर त्यावर या सर्व गोष्टी अवलंबून असते. जागतिक आरोग्य संघटनेच्या रोग नियंत्रण केंद्राच्या माहिती नुसार वृध्द आणि आरोग्य संबंधित समस्या असणा-या लोकांना विषाणूमुळे प्रभावित होण्याची शक्यता जास्त असते. उदा. ह्रदयरोग, मधुमेह, एच.आय.व्ही. किडनी, कॅन्सर यासारखे गंभिर आजार असणा-या व्यक्तींना संसर्गजन्य रोग होण्याची दाट शक्यता ज़ास्त असते. तरी ख़बरदारी म्हणून तरूण व निरोगी व्यक्तींनी सुध्दा सर्वोतोपरी स्वतःची व इतर सर्व सामान्य जनतेची काळजी घेणे आवश्यक आहे. या रोगाचे सर्व सामान्य लक्षणे म्हणजे ताप, खोकला, सर्दी, थकवा, डोकेदुखी, अतिसार, इत्यादी. भारतासारख्या देशात लोकसंख्येसाठी असलेली वैद्यकीय सोयी सुविधाची निर्माती, आहार, स्वच्छेसंबंधी जागरूकता या कठोर नियमाची आज गरज आहे. शासनांनी केलेल्या उपाययोजनांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

कोविड -19 यां जीव घेण्या विषाणूचे अध्ययन करण्यासाठी व शोध निबंध लिहीण्यासाठी पुढील उद्देश डोळयासमोर ठेवून संशोधन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या शोधनिबंधाचे उद्देश खालील प्रमाणे आहेत.

1. कोरोना विषाणूचा समाजावर झालेला परिणामाचा अभ्यास करणे.
2. कोविड- 19 च्या विषाणूमुळे देशाच्या अर्थकारणाचा अभ्यास करणे.
3. कोरोना विषाणूमुळे समाजाच्या आरोग्यावर झालेला परिणामाचा अभ्यास करणे.
4. कोरोनामुळे समाजाच्या विकासात आलेल्या अडचणीचा शोध घेणे.



PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli
Adarsh Arts & Commerce College Desaiganj

गृहितके किंवा उपकल्पना

कोविड -19 विषाणूजन्य आजारामुळे संपूर्ण संकटात सापडलेला आहे. हे लक्षात घेऊन पुढील उपकल्पनाची मांडणी केलेली आहे.

1. कोविड -19 मुळे देशातच नव्हे तर जगात सामाजिक समस्या निर्माण झालेल्या आहे.
2. कोविड -19 च्या विषाणूमुळे देशाच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम पडलेला आहे.
3. कोरोनामुळे समाजाचे आरोग्य धोक्यात आलेले आहे.
4. कोरोना विषाणूमुळे रक्ताच नात असलेला मणूष्य मणुष्या पासून दुर जात आहे.

संशोधन आराखडा

प्रस्तूत शोध निबंध कोविड -19 किंवा कोरोना ही एक नवोदित जागतिक समस्या आहे. त्यामुळे संशोधकांनी अन्वेषणात्मक संशोधन आराखडयाची निवड केलेली आहे. त्यामुळे या जीवघेण्या विषाणूची फारसी माहिती उपलब्ध नाही. तरी पण जगातील वैज्ञानिकांनी अहोरात्र मेहनत करून या विषाणूला हारविण्यासाठी किंवा कोरोनाचा नायनाट करण्यासाठी वैज्ञानिक संघटना, आरोग्य यंत्रणा, पोलीस यंत्रणा स्वतःच्या आरोग्याची काळजी न घेता समाजहित लक्षात घेऊन काम करीत आहे. नवनविन शोध संशोधन करून कोरोना नियंत्रणात आणण्यासाठी कोव्हीशिल्ड व कोव्हॅक्सिन सारख्या लसीची निर्मीती करण्यासाठी अहोरात्र झटत आहे. ही जैविक माहामारी किंवा लढाई जिकंण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत आहे.

तथ्य संकलन

प्रस्तूत शोध निबंधासाठी दुय्यम स्त्रोत म्हणून वर्तमान पत्रे, सासाहिके, पुस्तक, संदर्भग्रंथ इत्यादी साधनाचा उपयोग करण्यात येईल. या सोबत समाजातील तथ्य संकलनासाठी निरीक्षण पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

कोविड -19 चा भारतीय समाजावर परिणाम

कोविड -19 चा दुरगामी परिणाम भारतीय समाजावर पडलेला दिसून येते. भारतातील जवळपास 80 टक्के लोकांना आर्थिक तानतनावाचा सामना करावा लागत आहे. तसेच या लॉकडाऊनच्या काळात कित्येक लोकांना सामाजिक दुराव्यामुळे मानसिक तानतनाव व चिंतेला सामारे जावावे लागले. जवळपास 50 टक्के लोकांना या माहामारीच्या काळात नियमीत औषधी व आरोग्याच्या सोई सुविधासाठी. त्रास सहन करावा लागत आहे. काही दवाख्यान्यात बेडचा अभाव, ऑक्सीजनची कमतरता, व्हेंटीलेटरची कमी यामुळे फार बिकट परिस्थिती निर्माण होत आहे. मोठमोठया शहरातील कोविड सेंटरमध्ये नैसर्गिक आपत्तीने कित्येक लोकांना मृत्यूमुखी पडावे लागले आहे. तर काहींना अग्नीतांडवामुळे होरपळून जीव गमवावे लागले.



Adarsh Arts & Commerce College (Desaiganj)
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

**कोरोना विषाणूमुळे सामाजिक समस्याचा उदय**

कोरोना या संसर्गज्ञन्य रोग मानवी समाजात डिसेंबर 19 पासून जगाच्या वेगवेगळया देशात पाय पसरवायला सुरूवात केल्यामुळे जगातील जवळ पास 193 देशात कोरोना संसर्गजन्य रोग प्रसार झाला. यामुळे संपूर्ण आरोग्य यंत्रणा हादरली. कारण या विषाणूंने संपूर्ण जग आपल्या कवेत घेतला. या विषाणूमुळे देशाची अर्थव्यवस्था कोलमडून गेलेली आहे.

या विषाणूचा प्रभाव सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक, दळणवळण, पर्यटन, धार्मिकस्थळे, शेतीव्यवसाय या सर्व बाबींवर पडल्यामुळे जनजीवन विस्कळीत झालेला आहे. एक नव्हे तर अनेक समस्या निर्माण होत आहे. माणूस, सगेसोहरे, जीवलग मित्र जसे या रोगाचा प्रसार होण्या आधी मिळून मिसळून एकमेकांच्या सुख दुःखात सहभागी होत होते. आज ते चित्र आज दुरमिळ झाले आहे. मणूष्य या रोगाने भयभित झालेला आहे. मला ही या जीवघेण्या रोगाची लागन लागेल का? झाली नसेल का? असा प्रकारचे अनेक प्रश्न त्यांना भेडसावत आहे. त्यामुळे माणूस माणसापासून दुर जात आहे. एक प्रकारे कोरोना व्हायरस संपूर्ण मानव जात उदवस्त करणारा रोग म्हणावा लागेल. जगातील लोकांनी जे जे नियोजन केले ते पुर्णत्वास आले नाही.लग्नकार्य, नातेवाईकांच्या भेटीगाटी, पिकनिकस्थळाना भेटी, पर्यटनस्थळाना भेटी, यासारख्या सामाजिक कार्यावर फार वाईट दिवस आले. जवळचे नातेसंबंधित व्यक्ती मरण पावल्या नतंरही मरण तरणावर कसे जावावे. असा प्रश्न त्यांच्या मनात निर्माण होतात. लाॅकडाउनच्या काळात कामगार लोकांचे बेहाल झाले उपासीतापासी कडेवर मुल व डोक्यावर ओझ्याचा गठोडा घेवून कित्येक किंलोमीटर पायी चालण्याची वेळ कामगार मंडळीवर आली.

**आर्थिक समस्या**

कोणत्याही देशाची प्रगती त्या देशाच्या अर्थव्यवस्थेवरून दिसून येते. देशाचा विकास किती झाला हे पाहण्यासाठी एकूणच त्या देशातील व्यक्तींच्या राहणीमानावरून सुध्दा दिसते. पण कोविड-19 मुळे देशाची अर्थव्यवस्था थांबलेली आहे. याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झालेला दिसून येते. अर्थव्यवस्था ही फक्त शेअर बाजार व गुंतवणूकदार यांच्या पुरती मर्यादीत नाही. तर आपल्याकडे जे भाजीपाला दुध याची वाहतूक या सर्व गोष्टीचा परिणाम अर्थव्यवस्थेवर होत असतो. यासंदर्भात राष्ट्रवादी काग्रेसचे अध्यक्ष असे म्हणाले होते, की,"कोरोना व्हायरस हे मोठे संकट आहे. यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला फटका बसेल. पुढील काही महीने देशाची अर्थव्यवस्था नाजूक राहील आपल्याला काटकसर करावी लागेल" कारण देशातील कारखाने, लहानमोठे उद्योगधंदे व इतर उत्पादन देणारे साधने कोविड - 19 च्या व्हायरसमुळे जाग्यावर विकासाचा चक्र थांबलेले आहे. त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झालेला आहे.

देशाला सर्वात जास्त उत्पादन मिळवून देणारी रेल्वे थांबली. हे सुध्दा देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारी बाब आहे. एकूणच दळणवळणाची चक्रे थांबल्यामुळे देशाची अर्थव्यवस्था डबघाईस



PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

V. G. - 2020 - 21



येण्याची शक्यता नाकारता येत नाही. एस.टी. परीवाहन महामंडळ असो की, खाजगी प्रवाशी साधने या सर्व गोष्टीचा परिणाम सरकारच्या तिजोरीवर पडत असते. जवळपास मागील मार्च महिन्यापासून परिवाहन महामंडळ तोटयात चालत आहे. त्याचबरोबर उन्हाळयाच्या दिवसात व्यवसाय करणारे आईसक्रिम, लसीसेंटर या व्यावसायीकांचा उद्योग कोरोनामुळे बंद अवस्थेत आहे. याचा फटका सुध्दा देशाच्या अर्थव्यवस्थेचर पडत आहे. त्यामुळे आज आर्थिक स्थिती बिकट बनलेली आहे.

**आरोग्याची समस्या**

कोविड- 19 चा देश विदेशातील जनतेवर व त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम पडलेला आहे. या कोविड -19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी डाॅक्टर, कंपाउर, वार्डबाय, नर्सेस, तंत्रज्ञ, व काही समाजसेवी संस्था दिवसरात्र काम करीत आहे. त्याना मदत म्हणून पोलीस यंत्रणा सुध्दा देशाचे आरोग्य आबाधित ठेवण्यासाठी दिवसरात्र प्रयत्न करीत आहे. एवढ्रेच नाही. तर लोकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. घराबाहेर पडणे जीवाला धोका आहे. घरा बाहेर पडू नका. स्वतः ची काळजी घ्या. असा सल्ला ही पोलीस अधिका-याकडून दिला जात आहे. यां आरोग्य सेवेत कार्यरत अधिकारी, कर्मचारी वर्गाना आपले प्राण ही गमवावे लागत आहे. त्यासाठी घरी राहण्याचा, वारंवार हात स्वच्छ धुण्याचा, तोंडाला मास लाण्याचा व सुरक्षित अंतर ठेवण्याचा सल्ला पोलीस वर्गाकडून देवून समाज अबाधित राखण्याचा प्रयत्न होत आहे.

**शैक्षणिक समस्या**

कोरोना व्हायरसचा परिणाम देशातील शिक्षण संस्थेवर सुध्दा पडलेला आहे. ऐन परिक्षेच्या तोंडावर कोरोना व्हायरसनी आपले डोके वर काढले. आणि देशाच्या भावी पीढीची वाताहत झाली.अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी आई-वडिलांपासून दुर होते. पण लॉकडाउनच्या परिस्थितीत त्याची तांराबळ उडाली. देशप्रदेशात शिक्षण, उच्चशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यासमोर कोरोना व्हायरस रूपी राक्षस उभा झाला. यामुळे कित्येक विद्यार्थ्याची परिक्षा न घेता किंवा देता पुढच्या वर्गात ढकलण्यात येत आहे. याचा फार मोठा परिणाम विद्यार्थ्याच्या मानसिकतेवर होणार आहे. किंवा पडलेला आहे. अनेक कुटूंब गरीबीत जीवन जगत आहे. त्यामुळे आधुनिक पध्दतीने किंवा आॅनलाईन पध्दतीने शिक्षणासाठी लागणारे तंत्राची पुर्तता ते पुर्ण करू शकत नाही. अश्या गरीब कुटूंबातील मुलांना शिक्षणापासून वंचित राहण्याची पाळी आलेली आहे. याचा देशाच्या शिक्षण क्षेत्रावर फार मोठा गंभिर परिणाम पडलेला आहे. आज यामधून बेकारीची तिव्रता दिवसेंदिवस वाढणार आहे.

**कोरोना या संसर्गजन्य रोगाला हरविण्यासाठी उपाय**

कोविड -19 च्या आजारापासून स्वतःचे व कुटूंबाचे बचाव करण्यासाठी पुढील उपाय अमंलात आणणे गरजेचे आहे.

1. अॅल्कोहोल बेस्टहॅन्ड रबने स्वतःचे हात नियीमत स्वच्छ धुवावे.
2. खोकलणा-या व शिंकणा-या व्यक्तीपासून कमीतकमी एकमीटरचे अंतर ठेवावे.



PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

3. डोळे, नाक, व चेहऱ्याला वारंवार स्पर्श करू नये.
4. फेस मास्कचा वापर करा व योग्य पध्दतीने त्याची विल्हेवाट लावा.
5. आवश्यक नसेत तर घराबाहेर पडू नका. गर्दीच्या ठिकाणी जाण्याचे टाळा.
6. शासनाद्वारे ठरविण्यात वयोमानानुसार प्रत्येकांनी लसीकरण करून घ्यावे.

निष्कर्ष

कोरोना या विषाणूमुळे घाबरून जाण्याचे कारण नाही. पुर्वी ही सर्दी, खासी खोकला, ताप अशा स्वरूपाची लक्षणे असणारे रोग होते. पण आज आपणांला याची निट काळजी घेण्याची गरज आहे. हा कोरोना रोग बरा होवू शकतो. पण या रोगाचे मनावर वाईट परिणाम सुध्दा होवू शकतो. सकारात्मक विचार ठेवून कोरोनामधून बरा होण्याचा प्रयत्न केला पाहीजे. कोरोनाची भिती हेच एकमेव कारणामुळे वेगवेगळया रोगानी ग्रस्त असलेल्या व्यक्तीवर दुष्परिणाम होण्याची शक्यता जास्त असते.

कोविड -19 या संसर्गजन्य रोगाचा वाईट परिणाम देश, विदेशातील सर्व सामान्य जनतेवर पडलेला आहे. लोकांपासून लोकांना अलिप्त ठेवण्याचा हा प्रकार दिसतो. याचा आरोग्यावर फार मोठा गंभिर परिणाम झालेला आहे. देशातील सर्व लोक एक दुसऱ्यांच्या सुख दुःखात सहभाग घेत होते, एकदुसऱ्यांना शेकहॅन्ड करीत होते. पण आजची स्थिती फार वेगळी आहे. कोणताही व्यक्ती एकमेकांसोबत मनमोकळेपणानी गप्पागोष्टी करतांना दिसत नाही. चारचैघांसोबत बसणे उठणे नाही. त्यामुळे एकदुसÚया सोबत बोलणेही थांबलेला आहे. एकदुसऱ्यांना रामराम, नमस्कार किंवा ज्या अभिवादनांच्या पध्दती आहे. त्यानुसार दुरूनच अभिवादन करून बगल देण्याचा प्रयत्न करतात.

एक दुसयांवर जिवापाड प्रेम करणारे माणस एकमेकांच्या संपर्कापासून दुर जात आहे. कारोना व्हायरसचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर फारमोठा परिणाम होत आहे. देशाची अर्थव्यवस्था डबघाईस आलेली आहे. याचा परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर सुध्दा झालेला आहे. देशात जे विकासाची कामे सुरू होती, ती बंद झालेली आहे. एकूणच देशाच्या विकासात व प्रगतीत अडचण निर्माण झालेली आहे. म्हणूनच कोरोना विषाणू हा जागतिक प्रश्न बनलेला आहे. शेवटी असे म्हणावे लागेल, काळजी घ्या सुरक्षित राह.

संदर्भ सुची

1. डॉ. प्रदीप आगलावे भारतीय समाज प्रश्न आणि समस्या श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर
2. डॉ. सुधीर बोधनकर सामाजिक संशोधन पध्दती साईनाथ प्रकाशन नागपूर. 2014
3. डॉ. प्रदीप आगलावे सामाजिक संशोधन पध्दती व तंत्रे साईनाथ प्रकाशन नागपूर
4. दैनिक वर्तमानपत्र पुण्यनगरी दि. 01 एप्रील 2020
5. दैनिक वर्तमानपत्र लोकमत दि. 04 एप्रील 2020
6. दैनिक वर्तमानपत्र लोकमत दि. 05 एप्रील 2020



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli